रजि.नं. : ई-६९, अहमदनगर

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

शिर्डी : पोष्ट : शिर्डी - ४२३ १०९, ता. राहाता, जि. अहमदनगर, महाराष्ट्र (भारत).
दुरध्वनी : +९१-२४२३-२५८ ५०० फॅक्स : +९१-२४२३-२५८ ७७०, टेलिग्राम : साईनाथ, शिर्डी.

रजिस्टर्ड ए.डी.द्वारा

जा.नं.एसएसएसटी/सीसीटीव्हीसेल/ 4283 /२०२०.
दि.- 30 JAN 2020

## नोटीस

प्रति,
ईमरजन्सी इलेक्ट्रॉनिक सेक्युरीटी (आय) प्रा.लि,
२९, कलानगर, बांद्र ईस्ट,
मुंबई -४०० ०५१.

विषय –आपले कंपनीचे नावाचा पुढील तीन वर्षाकरीता "काळया यादीत" समावेश करणेत येत असलेबाबत...

संदर्भ – १) जा.नं.एसएसएसटी/सीसीटीव्हीसेल/३१९०/२०१९, दि.१८/११/२०१९ रोजीचा इमरजन्सी इलेक्ट्रॉनिक सेक्युरीटी (आय) प्रा.लि., मुंबई यांचा पुरवठा आदेश.
२) जा.नं.एसएसएसटी/सीसीटीव्हीसेल/३६२७/२०१९, दि.१७/१२/२०१९ रोजीचे स्मरणपत्र.
३) जा.नं.एसएसएसटी/सीसीटीव्हीसेल/४३१५/२०१८, दि.३०/११/२०१८ रोजीचा इमरजन्सी इलेक्ट्रॉनिक सेक्युरीटी (आय) प्रा.लि., मुंबई यांचा पुरवठा आदेश..
४) जा.नं.एसएसएसटी/सीसीटीव्हीसेल/४५७१/२०१७, दि.३०/११/२०१७ रोजीचा इमरजन्सी इलेक्ट्रॉनिक सेक्युरीटी (आय) प्रा.लि., मुंबई यांचा पुरवठा आदेश.
५) जा.नं.एसएसएसटी/सीसीटीव्हीसेल/४८५१/२०१९, दि.०१/०१/२०१९ रोजीचा इमरजन्सी इलेक्ट्रॉनिक सेक्युरीटी (आय) प्रा.लि., मुंबई यांचा पुरवठा आदेश.

सीसीटीव्ही विभागाकडील सीसीटीव्ही कॅमेरे दुरुस्ती/देखभालीकरीता कामकाजाचे दृष्टीने आवश्यक साहित्य पुरवठा करणेकामी आपणांस उपरोक्त संदर्भ क्र. १ अन्वये पुरवठा आदेश देण्यात आलेला होता. वास्तविक पुरवठा आदेशातील अट क्र.१ नुसार आपण सदर साहित्य संस्थानचे सीसीटीव्ही कंट्रोल सेलकडे ४ ते ५ दिवसांचे आत पोहोच करणे आवश्यक होते. परंतु, आपणांस वेळोवेळी दुरध्वनीद्वारे कळवुन तसेच चर्चा करुन देखील आपण साहित्य पुरवठा केलेले नाही.

तदनंतर आपण पुरवठा आदेशातील नमुद साहित्याचा पुरवठा १० दिवसांचे आत न केल्यास आपणांस देण्यात आलेला पुरवठा आदेश रद्द समजणेत यावा असे आपणांस उपरोक्त संदर्भ क्र.२ चे पत्राद्वारे कळविणेत आले आहे. तरी देखील आजअखेर आपण पुरवठा आदेशास अनुसरुन, साहित्य पुरवठा केलेले नाही.

तसेच मंदिर परिसरात सध्या कार्यान्वित असलेली **Live Darshan,** फोटोग्राफी व व्हिडीओ शुटींग यंत्रणेचे **Digitalization** करणेकरीता विविध प्रकारचे साहित्य, सॉफ्टवेअर कार्यान्वित करणेकामी आपणांस उपरोक्त संदर्भ क्र.३

MMB-D:\surveillance\files-2\Genral\539

अन्वये पुरवठा आदेश देण्यात आलेला होता. सदर पुरवठा आदेशास अनुसरुन, सर्व साहित्य कार्यान्वित करुन दिलेले आहे.

परंतु, करारनाम्यातील अट क्र.५ मधील ५.४,५.६,५.७ व १० मधील अटीस अनुसरुन, श्रीं चे लाईव्ह दर्शनासाठी कार्यान्वित करण्यात आलेल्या यंत्रणेचे **Support** तथा **Maintenance** करीता प्रतिनिधी उपस्थित ठेवणे आवश्यक आहे. तथापी, आपण आपल्या कंपनीचे प्रतिनीधी सदर अटीस अनुसरुन उपलब्ध करुन दिलेले नाही. त्याकरीता श्रीं चे लाईव्ह दर्शनासाठी कार्यान्वित करण्यात आलेल्या यंत्रणेचे **Support** तथा **Maintenance** करीता प्रतिनीधी उपलब्ध न ठेवल्यास तसेच **Support** तथा **Maintenance** ची कामे ७ दिवसाचे आत न केल्यास सदर **Support** तथा **Maintenance** इतर स्थानिक पुरवठाधारकाकडुन करुन सदर खर्चाची रक्कम आपल्या प्रलंबित बिलातुन वसुल करणेत येईल असे आपणांस उपरोक्त संदर्भ क्र.४ चे पत्राद्वारे कळविणेत आलेले आहे.

तसेच श्री साईबाबा महाविद्यालय येथे सीसीटीव्ही कॅमेरे व इतर अनुषंगीक साहित्य कार्यान्वित करणेकामी आपणांस उपरोक्त संदर्भ क्र.५ अन्वये पुरवठा आदेश देण्यात आला होता. सदर पुरवठा आदेशास अनुसरुन, आपण श्री साईबाबा महाविद्यालय येथे सीसीटीव्ही कॅमेरे व इतर अनुषंगीक साहित्य कार्यान्वित करुन दिलेले आहे. तथापी, काही दिवसांपासुन सदर सीसीटीव्ही कॅमेरे बंद असल्याने सदर सीसीटीव्ही कॅमेरे सुरु करुन देणेकामी आपले प्रतिनीधी यांना दुरध्वनीद्वारे कळविले असता त्यांनी देखील सदर सीसीटीव्ही कॅमेरे सुरु करणेबाबत कुठल्याही प्रकारचा प्रतिसाद मिळालेला नाही.

तसेच लेखाशाखा विभागातील स्ट्रॉंग रुम येथे अद्यावत सुरक्षा यंत्रणा कार्यान्वित करणेकामी उपरोक्त संदर्भ क्र.६ अन्वये आपणांस पुरवठा आदेश देण्यात आलेला होता. सदर स्ट्रॉंग रुम येथे देखील Access Control Reader system तसेच सीसीटीव्ही कॅमेरा कार्यान्वित करुन दिलेला नाही.

तरी, उपरोक्त सर्व गोष्टींचा सारासार विचार करता, आपल्याकडुन कुठल्याही प्रकारचा प्रतिसाद मिळत नसल्याने तसेच उपरोक्त संदर्भ क्र.१ अन्वये देण्यात आलेल्या पुरवठा आदेशातील साहित्याचा पुरवठा न करुन आपण पुरवठा आदेशातील अटी शर्तीचा भंग केलेला असल्याने आपले नावाचा पुढील तीन वर्षाकरीता काळया यादीत समावेश करणेत येत आहे.

(दी.म.मुगळीकर, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

MMB-D:\surveillance\files-2\Genral\540